# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
# राष्ट्रीय सेवा योजना

डॉ. संजयकुमार दळवी
एम्.एस्सी.,पीएच्.डी.
प्र. कार्यक्रम समन्वयक

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१


संदर्भ : रासेयो/१२१/२०१४ दि. २८ ऑगस्ट २०१४

प्रति
मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालये
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा

**विषय : राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय प्रजासत्ताक पूर्व संचलन व राष्ट्रीय प्रजासत्ताक पूर्व संचलन शिबिराच्या निवडीसाठी स्वयंसेवक पाठविण्याबाबत...**

महोदय,

दरवर्षी राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन शिबिर मुंबई येथे घेण्यात येते तसेच दिल्ली येथे राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचलन शिबिराचे आयोजन करण्यात येते. दि २६ जानेवारी २०१५ च्या प्रजासत्ताक दिन संचलनासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राज्यस्तरीय/राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन जिल्हास्तरीय निवडचाचणी शिबीराचे आयोजन **दि. ३ सप्टेंबर २०१४ रोजी सकाळी १०.०० ते ५.००** या वेळेत पुणे, अहमदनगर व नाशिक याप्रमाणे जिल्हानिहाय पद्धतीने करण्यात आले आहे. या शिबिराच्या निवडीसाठी आपण आपल्या महाविद्यालयातील **एक विद्यार्थी व एक विद्यार्थीनीस** खालीलप्रमाणे निवडचाचणी शिबिराकरीता पाठविण्यात यावे ही विनंती.

| अ.न. | महाविद्यालये | ठिकाण व दिनांक (दि.३ सप्टेंबर २०१४) | संपर्कासाठी फोन नं. |
|---|---|---|---|
| १. | पुणे शहर/पुणे ग्रामीण | मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे | फोन.०२०२५५३५९२७<br>प्रा. प्रभाकर वऱ्हाडे<br>९८२२८५६५२७ |
| २. | अहमदनगर जिल्हा | संगमनेर नगरपालिका कला, डी.जे. मालपाणी कॉमर्स, बी.एन.सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर, जि. अहमदनगर | फोन नं. ०२४२५–२२५८९३<br>डॉ. पी.एस. फलफले<br>मो. ८२७५२८१०८९,<br>९४२२३२६३४९ |
| ३. | नाशिक जिल्हा | कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदवड, जि. नाशिक | फोन नं. ०२५५६–०२५२१२५<br>प्रा.पी.आर.सोहनी<br>९८२२५४६६७६ |

तसेच या पूर्व निवडचाचणी शिबिरातून निवड झालेले स्वयंसेवकांस **दि. ५ सप्टेंबर २०१४ रोजी सकाळी ११.००** वाजता रासेयो विभाग, **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे याठिकाणी आयोजित विद्यापीठस्तरीय** निवडचाचणी **शिबिरास उपस्थित राहणे आवश्यक आहे.** या विद्यापीठस्तरीय निवडचाचणी शिबिरातून निवड झालेले स्वयंसेवक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

P.T.O.

या ठिकाणी दि ११ ते १३ सप्टेंबर २०१४ दरम्यान आयोजित राज्यस्तरीय/राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन निवड शिबिरामध्ये सहभागी होणार आहेत.

खालील गोष्टींचा विचार करून विद्यार्थ्यांची निवड करण्यात यावी.

१. स्वयंसेवकाने राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये एक वर्ष व एक शिबिर पूर्ण केलेले असावे.
२. स्वयंसेवक अविवाहित असावा.
३. मुली उंची १५५ ते १६५ से.मी.,
   मुले उंची १६५ ते १७५ से.मी. च्या दरम्यान
४. विद्यार्थी सुदृढ व सक्षम असावा., उंचीच्या मानाने कमी वजन असणारा नसावा.

   छाती : मुले –८०से.मी., मुली – ७५ से.मी.
   (फुगलेली व न फुगलेली छाती यातील अंतर किमान ५ से.मी.)

५. फिजीकल फिटनेस :
   १. रनअप : १.५ किमी अंतर – १० मिनीटे, परेड २० मिनीटे
   २. पुशअप्स व सिटअप्स
      एक दमात मुले –२०, मुली – १५
   ३. चिन अप्स मुले –०८, मुली – ०५

६. S.R.D/NRD साठी निवड झाल्यास स्वयंसेवकास प्रथमत: संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती या ठिकाणी राज्यस्तरीय S.R.D/NRD पूर्व निवडचाचणी शिबिरात सहभागी व्हावे लागेल.

७. स्वयंसेवकास रा.से.यो ध्येय, उद्दीष्टये व विविध उपक्रमांची संपूर्ण माहिती असावी.

८. वक्तृत्व/कला/सांस्कृतिक कार्यक्रम/वाद्य/नाटय यापैकी निपुण असलेल्या स्वयंसेवकास प्राधान्य दिले जावे.

९. स्वयंसेवकाची विद्यापीठस्तरीय निवडचाचणी दरम्यान भोजनाची व्यवस्था विद्यापीठामार्फत करण्यात येईल. (निवास व्यवस्था करण्यात येणार नाही.)

१०. स्वयंसेवकांचा विद्यापीठापर्यंत जाण्या–येण्याचा खर्च महाविद्यालयाने रा.से.यो.नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा.

११.एकूण N.R.D/S.R.D. – ४४ स्वयंसेवकांचीच निवड करावयाची असल्याने निवड चाचणीस उपस्थित राहिलात म्हणजे आपली निवड झालीच असे स्वयंसेवकाने समजू नये.

<u>स्वयंसेवकाने निवड चाचणीस येतांना खालील गोष्टी बरोबर आणाव्यात</u>.

१. स्वयंसेवकाचे ओळखपत्र
२. मा. प्राचार्यांचे संमतीपत्र
३. पालकांचे संमतीपत्र
४. वैद्यकीय प्रमाणपत्र
५. स्वयंसेवकाची माहिती

या संदर्भात अधिक माहिती हवी असल्यास रासेयो जिल्हा समन्वयक यांचेशी संपर्क साधावा.

**कळावे, धन्यवाद!**

आपला विश्वासू

28/8/14

**प्र.कार्यक्रम समन्वयक**
**राष्ट्रीय सेवा योजना**